२१६०-८२

परवानगी वर्ष : २००१-२००२ नुतनीकरण
माध्यम : मराठी
: विनाअनुदान

जा.क्र. माध्य.३(१४)/प्रथम मान्यता/पुवि/२००२-३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 27 JAN 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

विषय : प्रथम मान्यता. . .
हमाल पंचायत कष्टकरी विद्यालय, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे"--३७.

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक शिक्षण माध्य ह-४/प्रमा/०२-०३/१०१ दि. २१.१२.०२

२. शा.प.क्र. नमाशा- १००१ २०९/ २००१ माशि-१, दि. ४.४.२००१

३. कार्यालयाचे पत्र क्रं. माध्य-३/१४/ नमाशा/ मान्यता/ पुवि/२००१, दि. १८.३.२००२

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये हमाल पंचायत मार्केट यार्ड संस्थेच्या हमाल पंचायत कष्टकरी विद्यालय, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे- ३७. माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००१-२००२ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००१ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्ततेस अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

विना अनुदान

१. संस्थेनं स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. वरीलपैकी अटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

स्वाक्षरीत विभाग उपसंचालक
सही केलेली आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत :
१. मुख्याध्यापक हमाल पंचायत कष्टकरी विद्यालय, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७.

२. निवडनस्ती

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]

जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा./०२/०३
पुणे, दि. २१|६|२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

~~हमाल पंचायत कष्टकरी विद्यालय, मार्केटयार्ड~~
पुणे ३७.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३.
~~इ. ६ वी, इ. ७ वी~~, इ. ९ वी, इ. १० वी.

आपल्या हमाल पंचायत मार्केटयार्ड या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित कष्टकरी माध्यमिक विद्यालय, मार्केटयार्ड माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी ~~इ. ५ वी~~ या वर्ग नूतनीकरणाने सुरु करणेस सन २००१ - २००२ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/नूतनीकरण/०२, दि.१८|२|०२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००२ - २००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी, इ. ७ वी~~, इ. ९ वी, ~~इ. १० वी~~ या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि.प. पुणे / ~~गट शिक्षणाधिकारी, पं.स.~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणा-या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

[signature] २१/६/०२

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण (माध्यमिक) विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/
नै.वाढ/०५-०६
पुणे. दिनांक : १८/७/२००५.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
हमाल पंचायत कष्टकरी माध्य. विद्यालय,
मार्केटयार्ड, पुणे.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. २००५-०६
===== ~~इ.६ वी~~, इ.७ वी, ~~इ.९ वी~~, ~~इ.१० वी~~.

आपल्या हमाल पंचायत कष्टकरी संस्था, पुणे. या शैक्षणिक संस्थेद्वारा संचलित हमाल पंचायत कष्टकरी माध्य. विद्यालय, पुणे. माध्यमिक विद्यालयास ~~इ.८ वी~~/इ.५ वी चा वर्ग सुरू करणेस सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३(१४)/नमाशा/मान्यता/पुव/२३०५८/६०, दि. १८/१०/२००४ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, इ.७ वी, ~~इ.९ वी~~, ~~इ.१० वी~~ या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरू होत आहे. सदर वर्गास जून २००५ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करून घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे~~/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती हवेली यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करून घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

~~ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी चा वर्ग सुरू होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस सांकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.~~

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ट-४/
ने.वाढ/०३-०४
पुणे. दिनांक : ८/११/२००४.

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
हमाल पंचायत कष्टकरी माध्य. विद्यालय,
मार्केटयार्ड, पुणे.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.२००४-०५
===== इ.६ वी, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, ~~इ.१० वी~~.

आपल्या हमाल पंचायत कष्टकरी संस्था, पुणे
या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित हमाल पंचायत कष्टकरी माध्य.विद्या.मार्केटयार्ड,पुणे.
माध्यमिक विद्यालयास ~~इ.८ वी~~/इ.५ वी.चा वर्ग सुरु करणेस सन २००३-०४
या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे यांचेकडील
आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुव/२३७५८/६०, दि. ९/७/०४
अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. ~~सन~~ २००४-२००५ या शैक्षणिक
वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.६ वी, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, ~~इ.१० वी~~ चा
वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००४ पासून नैसर्गिक वाढीने
परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन
घेणेसाठी संबंधित उप ~~शिक्षणाधिकारी~~, जिल्हा ~~परिषद~~, पुणे/गट
शिक्षणाधिकारी, पंचायत समिती [खेड] यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची
वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर
करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा
वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय
मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता
वेळेत करावी अन्यथा शाळेस सांकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार
राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

[signature]

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/
नै.वाढ/०३-०४
पुणे. दिनांक : १६/६/२००३

प्रति,

मुख्याध्यापक / ~~मुख्याध्यापिका~~,
ह.पं. कष्टकरी माध्यमिक विद्यालय,
मार्केटयार्ड, पुणे-३७.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. २००३-०४
===== ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी.

आपल्या हमाल पंचायत, पुणे.
या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित ह.पं. कष्टकरी माध्य. विद्या. मार्केटयार्ड, पुणे-३७ माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/~~इ.५ वी~~.चा वर्ग सुरु करणेस सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/१३३०२/०१, दि.१६/३/२००२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी~~, ~~इ.७ वी~~, ~~इ.९ वी~~, इ.१० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००३ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद~~, पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती मनपा यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरु होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

J.N.H.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणेकरिता.

आवक क्र. १६/०३-०४
दि. १६/६/०३ फाईल नं.